**विशेष दिवाणी दावा क्र. १२९/२०११**

**CNR No. MHSO060004602011**

कमलाकर साळुंखे (मयत) वारस वगैरे

वि.

बाबुराव जवळेकर वगैरे

## आदेश निशाणी क्र. १४२ वर

०१. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी क्र. ३२ प्रमाणे अर्ज देवून दिनांक १६/१२/२००१ रोजीचे विवाद्य साठेखत वादी यांनी इंपाऊंड करण्यासाठी दाखल करावे अशी विनंती केली होती. ती विनंती माझे पुर्वीचे मा. पिठासीन अधिकारी यांनी मान्य केलेली आहे. परंतु तरी देखील अद्याप वादी यांनी नमूद मुळ साठेखताचा दस्त न्यायालयात दाखल केलेला नाही.

०२. वादी यांनी निशाणी क्र. १३२ वर म्हणणे देताना नमूद मुळ दस्त हा वादी यांच्या ताब्यात नाही. त्यामुळे तो दाखल करता येत नाही. सदर दस्त दुस-या कामात दाखल केला आहे व तो मिळताच दाखल करतो असे सांगितले आहे. परंतु वादी यांनी तथाकथीत साठेखताचा दस्त कोणत्या प्रकरणामध्ये दाखल केला आहे ? त्या प्रकरणाचा क्रमांक काय ? सदर प्रकरण कोणते न्यायाधिकरण यांचेसमोर प्रलंबित आहे ? याबाबतचा तपशीलवार खुलासा केलेला नाही. तो करावा यासाठी हा अर्ज देण्यात आलेला आहे.

०३. त्यावर वादी यांनी नमूद केले की, मुळ वादी कमलाकर हे मयत आहेत. त्यांनी कोणत्या महसूल प्रकरणात मुळ साठेखताचा दस्त दाखल केला आहे याची माहिती त्यांचे वारस वादी यांना नाही. त्यामुळे याबाबतची माहिती वादी देवू शकत नाहीत. प्रकरणात विलंब व्हावा यासाठी हा अर्ज दिलेला आहे. तो नामंजूर करण्यात यावा. आज रोजी वादी व त्यांचे वकील युक्तिवादासाठी गैरहजर आहेत.

०४. अस्सल साठेखताचा दस्त कोठे आहे याबाबत वादी यांना माहिती नाही. मुळ वादी हे मयत आहेत. त्यामुळे त्यांचे वारसांना त्याबाबत माहिती देण्याचा आग्रह वादी यांना करणे योग्य होणार नाही. परंतु न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मुळ दस्त दाखल करण्याची जबाबदारी वादी यांचेवर आहे. तरी देखील जर तो दस्त वादी यांनी दाखल केला नाही तर त्याचे पुढील कायदेशीर परिणामास वादी हे जबाबदार राहतील. त्यामुळे हा अर्ज दप्तर दाखल करण्याचा आदेश देणे योग्य राहील. सबब मी पुढील प्रमाणे आदेश देत आहे.

**आ दे श**

निशाणी क्र. १४२ प्रमाणेचा अर्ज दप्तरी दाखल करण्यात येत आहे.

स्वाक्षरी/-

दि. ०२/०३/२०२१

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर

**CERTIFICATE**

I, affirm that the contents of this PDF file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of stenographer | : | A. S. Bavikar |
| Name of the Court | : | Jt. C.J.S.D., Pandharpur |
| Order signed by the P. O. on | : | 02/03/2021 |
| Order uploaded on | : | 02/03/2021 |